महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. : तंशिविकापु/संस्थास्तर प्रवेश/२०२४/4341
दिनांक : २५/१०/२०२४ 25 OCT 2024

प्रति,

प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त बीसीए/बीबीए/बीएमएस/एमबीए इंटिग्रेटेड/एमसीए इंटिग्रेटेड या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये बीसीए/बीबीए/बीएमएस/एमबीए इंटिग्रेटेड/एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी संपन्न झाल्यानंतर उर्वरित राहिलेल्या रिक्त जागा तसेच संस्थास्तरावरील जागांवर प्रवेश करताना नियमांचे पालन करण्याबाबत..**

**संदर्भ** :- १. संचालनालय, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई याचे पत्र क्र.२/एनजीसी/संस्थास्तर प्रवेश/२०२४/८८६ दि.२२.१०.२०२४
२. संचालनालय, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई याचे पत्र क्र.२/एनजीसी/संस्थास्तर प्रवेश/२०२४/८८८ दि.२३.१०.२०२४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये बीसीए/बीबीए/बीएमएस/एमबीए इंटिग्रेटेड/ एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी संपन्न झाल्यानंतर उर्वरित राहिलेल्या रिक्त जागा तसेच संस्थास्तरावरील जागांवरील प्रवेश प्रक्रियेसंदर्भात पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकांमधील मुद्दा क्र. १३ (पदवी व पदव्युत्तर पदवी माहिती पुस्तिका २०२४-२५ पृष्ठ क्र.७९) अन्वये प्रवेश प्रक्रिया काटेकोरपणे राबविण्याबाबत नमूद केले आहे.

या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील बीसीए/बीबीए/बीएमएस/एमबीए इंटिग्रेटेड/एमसीए इंटिग्रेटेड या व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना सूचित करण्यात येते की, आपल्या संस्थेच्या संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर उपरोक्त तरतूदीनूसारच प्रवेश प्रक्रिया काटेकोरपणे राबविण्यात यावी. याबाबत नियमबाहय पध्दतीने प्रवेश झाल्याचे सिध्द झाल्यास असे प्रवेश प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या स्तरावर रद्द होतील, याची नोंद घ्यावी.

तसेच सदरील अभ्यासक्रमात संस्था स्तरावर करण्यात आलेल्या प्रवेशासंबंधिचा अहवाल दि.०७.११.२०२४ रोजी पर्यंत या विभागीय कार्यालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :-१. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई (कार्यसन क्र. २) यांना माहितीस्तव
२. प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता